अस्सल सोलापुरी

# सुराज्य

सोलापूर

सोलापूर, पुणे, सांगली, धाराशिव, लातूर, विजयपूर, कलबुर्गी, बिदर, बीड

www.surajyadigital.com । गुरुवार, दि. ५ मार्च २०२६ । ▸ वर्ष : २४ वे ▸ अंक : १५५ वा ▸ किंमत : ५ रुपये ▸ पाने ८


## बिहारच्या सत्तेत अवघ्या ४ महिन्यातच खांदेपालट?



पाटणा : राज्यसभा निवडणुकीच्या पार्श्वभूमीवर राजकीय घडामोडींना वेग आला आहे. राज्यसभेसाठी भाजपाने याद्या जाहीर केल्या आहेत. परंतु, यातच आता बिहारचे मुख्यमंत्री नितीश कुमार यांना राज्यसभेवर पाठवायची तयारी सुरू झाल्याचा दावा केला जात आहे. नितीश कुमार राज्यसभेवर गेले, तर बिहारमध्ये भाजपाचा मुख्यमंत्री होऊ शकतो, असा कयास बांधला जात आहे.

भाजपने राज्यसभेसाठी ९ नावांची पहिली यादी घोषित केली आहे. या यादीत पक्षाध्यक्ष नितिन नवीन यांच्या नावाचाही समावेश आहे. भाजपने त्यांना बिहारमधून राज्यसभेवर पाठवण्याचा निर्णय घेतला आहे. भाजपने जाहीर केलेल्या यादीनुसार, बिहारमधील २, आसाममधील २, ओडिशातील २ आणि छत्तीसगड, हरियाणा आणि ओडिशातील प्रत्येकी एका उमेदवाराचे नावे आहे. यानंतर आता महाराष्ट्रातील यादीही जाहीर करण्यात आली आहे.

नितीश कुमार यांना राज्यसभेवर पाठवण्याची शक्यता राजकीय वर्तुळात जोरदार चर्चा होत आहे. या मोठ्या उलटफेरीबाबत पक्षात चर्चा सुरू आहेत. जर नितीश कुमार यांनी दिल्लीच्या राजकारणात येऊन राज्यसभेचे सदस्य होण्याचा निर्णय घेतला तर बिहारमधील मुख्यमंत्रीपदाची जागा रिक्त होईल.

# सोलापुरात ऐन गरमीत आमदारकीची रंगपंचमी




## २ महिने रंगणार निवडणुकीचा थरार | १५ एप्रिल दरम्यान वाजणार तुताऱ्या

सोलापूर/प्रतिनिधी

महाराष्ट्राच्या विधिमंडळाला पुढच्या २ महिन्यांमध्ये तब्बल १६ नवे आमदार मिळणार आहेत. त्यामुळे अनेकांनी गुडघ्याला आतापासूनच बाशिंग बांधले आहे. या १६ पैकी १४ विधानपरिषदेत आणि २ सदस्य विधानसभेसाठी निवडले जाणार आहेत. विशेष म्हणजे यातील काही ठिकाणी निवडणुकीची प्रक्रिया सुरु देखील झाली आहे. दरम्यान सोलापूर जिल्ह्यात विधान परिषदेच्या निवडणुकीच्या पार्श्वभूमीवर, तीव्र उन्हाळ्याच्या गरमागरमीत राजकीय आखाडा तापणार आहे. सोलापूर जिल्ह्यातील नगरपरिषदा, अनगर नगरपंचायत, सोलापूर महापालिका आणि जिल्हा परिषद तसेच पंचायत समित्यांच्या निवडणुकीमध्ये इतिहासात पहिल्यांदाच भाजपला विक्रमी यश मिळालं आहे. स्थानिक स्वराज्य संस्थांमध्ये भाजपचे साधारण ३३४ सदस्य झालेत. त्यामुळं या पक्षाला सोलापूर जिल्ह्यात विधान परिषदेची निवडणूक 'वन वे' वाटत असावी. त्या पार्श्वभूमीवर, इथली विधान परिषदेची जागा घेण्यासाठी भाजप मागील काही महिन्यांपासूनच सज्ज आहे. तर दूसऱ्या बाजूला विरोधकांकडून सदस्य संख्यांची आकडेमोड चालू असून या निवडणुकीसंबंधी चाचपणी सुरु आहे.

महाराष्ट्राच्या विधानपरिषेतील विधानसभेतून निवडून गेलेल्या ९ आमदारांचा कार्यकाळ येत्या १३ मे रोजी संपत आहे. त्यासाठी १५ एप्रिलच्या आसपास निवडणूक जाहीर होणार आहे. याशिवाय काँग्रेसच्या आमदारकीचा राजीनामा देऊन भाजपमध्ये प्रवेश केलेल्या प्रज्ञा सातव यांचीही जागा सध्या रिक्त आहे.

(अधिक वृत्त पान ५ वर...)

### पुन्हा चौफेर उधळणार जयाभाऊंचा अश्व; सोबतीला सचिनदादा अन् देवेंद्रदादांची साथ!




मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांचे विश्वासू आणि निकटवर्तीय शिलेदार ग्रामविकास मंत्री तथा सोलापूर जिल्ह्याचे पालकमंत्री जयकुमार गोरेंनी सोलापूर जिल्ह्यात शत-प्रतिशत भाजप' ही संकल्पना प्रत्यक्ष सत्यात उतरवण्याचा विडा उचलला. मुख्यमंत्र्यांची ताकद घेऊन त्यांनी या जिल्ह्यात स्थानिक स्वराज्य संस्थांच्या निवडणुकीत भाजपची त्सुनामी आणली. नामदार गोरेंचा अश्व सोलापूर जिल्ह्यात भाजप लोटस ऑपरेशन आणि निवडणुका या पार्श्वभूमीवर, चौफेर उधळला. आता विधान परिषदेच्या निवडणुकीमध्येदेखील पालकमंत्री गोरेंचा 'होल्ड' राहणार आहे. त्यांच्या सोबतीला अक्कलकोटचे आमदार सचिन कल्याणशेट्टी तसेच सोलापूर शहर मध्य विधानसभेचे भाजप आमदार देवेंद्र कोठेंची साथ त्यांना मिळणार आहे. नामदार गोरे आणि आमदार कोठे तसेच कल्याणशेट्टी या तिघांच्या नेतृत्वाच्या करिष्मा सोलापूर जिल्ह्यातील विधान परिषद तसेच शिक्षक आणि पदवीधर मतदार संघाच्या निवडणुकीत दिसू शकतो.

### ज्याला भाजपची उमेदवारी तो होणार 'आमदार'



सोलापूर जिल्ह्यात स्थानिक स्वराज्य संस्थांमध्ये भाजप सदस्यांची संख्या साधारण ३३४ प्लस आहे. त्यामुळं या पक्षाकडून ज्या चेहऱ्याला अधिकृत उमेदवारी मिळणार तो चेहरा विधीमंडळात आमदार म्हणून जाणार हे त्रिकालाबाधित सत्य आहे. त्यामुळं भाजपची उमेदवार मिळवण्यसाठी मोठी स्पर्धा आत्तापासून लागली आहे.

### राऊत, पाटील अन् परिचारक, सातपुते यांची नावे श्रेष्ठीपुढं; देवाभाऊ कोणाच्या नावावर उमटवतील मोहर?



सोलापूर जिल्ह्यातील विधान परिषदेच्या आमदारकीसाठी अनेक इच्छुकांनी गुडघ्याला बाशिंग बांधून आमदारकीच्या बोहल्यावर चढण्याची तयारी केली आहे. विधान परिषदेसाठी भाजपकडून अधिकृत उमेदवारी मिळावी, यासाठी गॉडफादरांकडे इच्छुकांकडून लॉबिंगदेखील सुरु आहे. माजी आमदार प्रशांत परिचारक, राजन पाटील, राजेंद्र राऊत, राम सातपुते आदींची नावे सध्या श्रेष्ठीपुढं प्रबळ दावेदार म्हणून असल्याची माहिती खात्रीलायकरित्या मिळाली आहे. मात्र मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस हे सोलापूर जिल्ह्याच्या भाजपमधील कोणत्या चेहऱ्याच्या नावावर विधान परिषदेच्या उमेदवारीची मोहर उमटवणार? याबद्दलचे औत्सुक्य आहे.

### पंढरपूरचं 'नो' एन्ट्री, 'नो' इमानी प्रकरणाचा विधीमंडळात पोलखोल

## दोषी पोलिसांवरील कारवाईसाठी आमदार राजू खरे आक्रमक

पंढरपूर/प्रतिनिधी



- पीएसआय वाघमोडेंसह दोषी कर्मचाऱ्यांना घरचा रस्ता दावण्याची मागणी
- चौकशी करून कारवाई करण्याचे तालिका अध्यक्षांचे निर्देश

पंढरपूर शहरातील सांगोला चौकात एन्ट्रीचा नावाखाली पोलिसांनी दोन हजाराची 'माया' उकळली. त्याशिवाय मागून तितक्याच रकमेचे दंडाचे चलानही पाठवले. याबद्दल जाब विचारणाऱ्या ट्रॅक चालकास पोलिसांनी बेदम मारहाण केली. या घटनेचे पडसाद बुधवारी (ता. ४) राज्य विधीमंडळाच्या अधिवेशनात उमटले. आमदार राजू खरे यांनी या प्रकरणाचा पोलखोल सभागृहात करुन दोषी पोलीस निरीक्षक दशरथ वाघमोडेंसह चालकास मारहाण करणाऱ्या चार ते पाच पोलिस कर्मचाऱ्यांना निलंबित करुन घरचा रस्ता दावण्याची आक्रमकपणे आग्रही भूमिका घेतली. दरम्यान तालिका अध्यक्ष यांनी या प्रकरणी

(अधिक वृत्त पान ५ वर...)

ट्रक चालक आल्यानंतर कर्मचाऱ्यांनी त्याला विचारणा केली व त्याचे ई चलन केले त्याचा राग येऊन त्याने असा आरोप केला आहे. पोलीस कर्मचाऱ्यांनी कोणतीही रोख रक्कम स्वीकारली नाही. ई चलन केल्याची पावती आमच्याकडे उपलब्ध आहे. केलेले आरोप निराधार आहेत.

**– दशरथ वाघमोडे**
पोलीस निरीक्षक शहर पोलीस ठाणे पंढरपूर

ICC MEN'S T20 WORLD CUP

**आजचा सामना**

भारत v/s इंग्लंड

स्थळ : वानखेडे, मुंबई
वेळ : सायंकाळी ७ वाजता

## आमदार कल्याणशेट्टी भास्कर जाधवांना भिडले, विधीमंडळ परिसरात दोघा आमदारांची बाचाबाची!

- सचिनदादांनी सोलापुरी भाषेत विचारला जाब
- बाप काढण्यावरुन शाब्दिक हल्ल्याची निघाली तलवार बाहेर
- विधीमंडळ पोर्चमध्ये एकच गोंधळ

सोलापूर/प्रतिनिधी

अक्कलकोट (सोलापूर) भाजपचे आमदार सचिन कल्याणशेट्टी आणि उद्धव ठाकरे शिवसेना गटाचे ज्येष्ठ आमदार भास्कर जाधव यांच्यात बुधवार (ता.४) मुंबईमधील विधीमंडळ पोर्च परिसरात मोठी बाचाबाची झाली. भास्कर जाधवांची जीभ घसरली आणि जाधवांनी सरकारचा 'बाप' काढल्याने संतापलेले आमदार कल्याणशेट्टी जाधवांना चांगलेच भिडले. त्यांनी खास सोलापुरी शैलीत जाधवांना जाब विचारला...



मुंबई : विधीमंडळ पोर्चमध्ये बाप काढण्यावरुन एकमेकांसमोर आलेले आ.सचिन कल्याणशेट्टी आणि आ.भास्कर जाधव.

> मी सभागृहात प्रवेश करत होतो, तेव्हा ते सरकारचा बाप काढत होते. अपशब्द ते वापरत होते, ते माझ्या कानावर पडलं. यासंदर्भात मी त्यांना तक्रार करा, असं सांगत होतो. बाहेर आल्यावर काय बोलावं हे सांगत होतो. इथे परिवार म्हणून राहातो, लग्न पत्रिका एकमेकांना देतच असतो ना, म्हणून काय कोणाचा किंवा सरकारचा बाप काढणं योग्य नाही. त्यांना समजावून सांगत होतो, मात्र त्यांना कळत नव्हतं. विरोधी पक्षनेतेपद मिळत नाही, म्हणून ते असे वागत असावे. मूळात हे वागणं चुकीचं होतं, सरकारचा बाप काढणं योग्य नव्हतं.
>
> **–सचिन कल्याणशेट्टी,** आमदार, अक्कलकोट

### वादाची ठिणगी पडण्याचं नेमकं कारण काय?

विधानसभा आमदार राहुल आवाडे यांची मुलगी सानिका आणि राजेंद्र पाटील यड्रावकर यांचे चिरंजीव अजय यांचा विवाह सोहळा १५ मार्च रोजी पार पडणार आहे. त्या अनुषंगाने, एकाच ठिकाणी सोईस्कर होईल म्हणून आमदारांच्या खासगी सहाय्यकांकडून लग्नपत्रिकेचे वाटप केले जात होते, अशातच, विधीमंडळ आवारात पत्रिका वाटत असल्याने भास्कर जाधवांकडून जहरी टीका करण्यात आली. जाधवांनी सरकारचा बाप काढल्याने भाजप आमदार सचिन कल्याणशेट्टी भडकले. यावर काही हरकत असेल तर तक्रार करा, बाप काढायचा अधिकार कुणी दिला म्हणत कल्याण शेट्टी आक्रमक झाले. या वादामुळे परिसरात काहीकाळ एकच गोंधळ झाल्याचे बघायला मिळालंय.

### तुम्ही बाप काढला तर मीपण काढेन!

मिळालेल्या माहितीनुसार, तुम्ही बाप काढलाय, बाप काढायचा अधिकार तुम्हाला आहे का? तुम्ही जेष्ठ सदस्य आहे. तुम्ही बाप काढला तर मीही काढेन, असं म्हणत सचिन कल्याणशेट्टी यांनी भास्कर जाधवांना जाब विचारलाय.

### तिसरा डोळा

– प्रकाश पोरे



गृहपयोगी वस्तूंची टंचाई होणार, म्हणून आधीच सामान भरून ठेवले !

3 4 9

### राज्यसभा निवडणूक : महाविकास आघाडीतील तिढा सुटला

## काँग्रेसकडून ग्रीन सिग्नल, शरद पवारांचा मार्ग मोकळा



मुंबई/प्रतिनिधी

महाविकास आघाडीतून राज्यासभेवर जाण्याचा ज्येष्ठ शरद पवार यांचा मार्ग मोकळा झाला आहे. महाविकास आघाडीचा उमेदवार कोण असेल,याकडे राजकिय क्षेत्राचे लक्ष लागून होते. शरद पवार राष्ट्रवादी काँग्रेस, शिवसेना आणि काँग्रेस या तिघांनी उमेदवारी मागितली होती. त्यावर गेल्या आठ-दहा दिवसांपासून चर्चेद्वारे खल सुरू होता मात्र काँग्रेसच्या दिल्लीतील हायकमांडनी पवार यांना पाठिंबा देण्याचे निर्देश प्रदेश समितीला दिले. काँग्रेसने ग्रीन सिग्नल दिल्यामुळे पवार यांचा मार्ग मोकळा झाला आहे तर काँग्रेसच्या दिल्लीश्वरामुळे शिवसेनेला नमती भूमिका घ्यावी लागली शरद पवार यांच्या नावाला अखेर महाविकास आघाडीने पाठिंबा दिला असून काँग्रेसकडून तशी घोषणा बुधवारी करण्यात आली. काँग्रेस प्रदेशाध्यक्ष हर्षवर्धन सपकाळ आणि खासदार सुप्रिया सुळे यांनी पत्रकार परिषद घेऊन याबाबत घोषणा केलीय.उद्धव ठाकरे शिवसेनेचे नेते संजय राऊत यांनीही ट्विट करुन महाविकास आघाडी एक राहील, असे म्हणत शरद पवारांच्या नावासा पाठिंबा असल्याचे सूचवले आहे. राज्यसभेच्या उमेदवारीसाठी उमेदवारी अर्ज भरण्याचा आज शेवटचा दिवस असल्याने महाविकास आघाडीकडून कोणाचे नाव निश्चित होणार, याकडे सर्वांचे लक्ष लागले होते. काँग्रेस आणि ठाकरेंची शिवसेना हे दोन्ही पक्ष आग्रही होते. मात्र, राष्ट्रवादी काँग्रेसकडे संख्याबळ कमी असतानाही ज्येष्ठ नेते म्हणून दोन्ही पक्षाच्या प्रमुखांना शरद पवार यांच्या नावाला पाठिंबा दिला. महाराष्ट्रातील राज्यसभेच्या ७ जागांसाठी निवडणूक पार पडत आहे. या ७ पैकी ६ जागांवर महायुतीचे उमेदवार जिंकून येण्याची शक्यता आहे. तर महाविकास आघाडीला केवळ एका जागेवर यश मिळण्याची शक्यता आहे. या एका जागेसाठी महाविकास आघाडीत रस्सीखेच बघायला मिळत होती.

### अधिकारी सिल्व्हर ओकवर जाणार

शरद पवार यांच्या प्रकृती अस्वस्थतेमुळे शरद पवार उमेदवारी अर्ज भरण्यासाठी सभागृहात येणार नाहीत. त्यामुळे आज कदाचित विधिमंडळातील अधिकारी शरद पवार यांना सिल्व्हर ओक निवासस्थानी जाऊन उमेदवार अर्ज भरतानाची गोपनियेतीची शपथ देण्यात येणार असल्याची विश्वसनीय सूत्राची माहिती आहे.